# <u>फळसेवाडी हितकारी संस्था</u>
## कार्यकारीणी सभा

**दिनांक** : रविवार 19 जून 2005
**स्थळ** : 14 कर्मचारी निवास, शहाजीराजे भोसले क्रिडा संकुल, अंधेरी – पूर्व, मुंबई – 400 053

उपस्थिती

| | |
|---|---|
| 1. श्री मंगेश मनोहर राणे | 5. श्री हेमंतकुमार रमेश राणे |
| 2. श्री पांडूरंग सावजी राणे | 6. श्री रंजन रावजी म्हसकर |
| 3. श्री उदय भगवान राणे | 7. श्री शंकर बाळकृष्ण राणे |
| 4. श्री सुनिल सदानंद राणे | 8. श्री अशोक दत्ताराम राणे |

उपरोक्त संस्थेची मिटींग दिनांक 19 जून 2005 रोजी झाली. या सभेस 8 सभासद उपस्थित होते. संस्थेचे अध्यक्ष श्री मंगेश मनोहर राणे हे स्थानापन्न झाल्यानंतर सभेच्या कामकाजास सुरवात झाली.

वाडीतील विविध समस्यांवर चर्चा झाली व खालील महत्वाच्या मुद्यांवर संबधीत खात्यांशी पत्रव्यवहार करावा असे ठरले. तसेच वाडीतील रस्ता टेंबावर नेण्यासाठी वाटेत मध्ये येणाऱ्या जमिनमालकांसंबधी पत्र व्यवहार करण्यासंबधी चर्चा झाली व तश्या तऱ्हेने लेखी पत्र लिहून संबधीत जमिन मालकांकडून जमिन संपादन करण्यासंबधी पुढे वाटचाल करावी असा निर्णय झाला.

उपखजिनदार श्री उदय भगवान राणे यांनी आपल्या संस्थेचा व्यवहार ऑडीट करून तो धर्मदाय आयुक्ताकडे दिला आहे त्यामुळे पुढे काही अडचणी येणार नाहीत याची माहिती दिली. सर्व सभासदांनी त्याबद्दल श्री उदय भगवान राणे यांचे आभार मानले.

यावेळी काही सभासदांनी आपले फार्महो भरुन दिले.

---